# कापुस संशोधन विभाग
# डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला

**डॉ. संतोष जे. गहुकर**
वरिष्ठ संशोधन शात्रज्ञ,(कापुस)

☏ 0724 – 2258176 (कार्यालय)
Fax 0724 – 2258176
ई मेल : aiccip.akola@gmail.com

जा.क्र.वसंशा ,(कापुस)/ ८५ / २०२६-२७ दिनांक -०५ /०५/२०२६

## निविदा सूचना

कापुस संशोधन विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला येथील प्रक्षेत्रावर बिजोत्पादन कार्यक्रम, इतर संशोधनात्मक प्रयोग व प्रक्षेत्रावरील कामे कंत्राटीपद्धतीने करण्याकरिता कुशल /अकुशल मजुरांचे (स्त्री /पुरुष) खालील प्रमाणे दर सादर करावे. दिनांक १४/०५/२०२६ पर्यंत निविदा सादर कराव्यात.

| अ.क्र. | कामाचा तपशील | दर (रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | शेतातील काशा/धसकटे/काडी कचरा वेचणे | प्रती हेक्टर | प्रक्षेत्रावरील कापुस पिकासंबंधी कामे |
| २ | बियाण्यास बीजप्रक्रिया करणे | प्रती क्विंटल | |
| ३ | शेणखत भरने /उतरविणे/वाहतुक (वाहन व मजुरासह) | ५ टन | |
| ४ | शेणखत पसरविणे | ५ टन | |
| ५ | बिजोत्पादन मधील भेसळ काढणे | प्रती क्विंटल | |
| ६ | बियाणे टोकन पेरणी करणे जास्त अंतर | प्रती हेक्टर | |
| | बियाणे टोकन पेरणी करणे कमी अंतर | | |
| ७ | पिकाची विरळणी करणे | प्रती हेक्टर | |
| | जास्त अंतर | | |
| | कमी अंतर | | |
| ८ | पिकांना पाणी देणे | प्रती हेक्टर | |
| | स्पिंक्लर | | |
| | मोकाट पद्धत | | |
| ९ | दांड तयार करणे | प्रती हेक्टर | |
| १० | तन नाशकाची फवारणी (७०० ली. पाणी ) नपसक स्प्रे मजुरासह | प्रती हेक्टर | |
| ११ | पाठीवरील पंपाने फवारणी करणे (साधा पंप ) | प्रती हेक्टर | |
| | पावर पंपाने फवारणी करणे (पेट्रोल सह) | प्रती तास | |
| | ट्रक्टर ने बूम स्प्रे पंपाद्वारे | प्रती हेक्टर | |
| १२ | वरखते देणे | प्रती हेक्टर | |
| | सरत्याने देणे | | |
| | बांगडी पद्धतीने | | |
| | हाताने फेकणे | | |
| १३ | निंदन करणे (खरीप ) | प्रती हेक्टर | |
| १४ | कपाशी पिकामध्ये परागीकरण व स्वपरागीकरण करणे, पिकावरील किडींचे व रोगांचे निरीक्षण घेणेकरिता मदत करणे, प्रयोगातील निरीक्षणे घेणेकरिता मदत करणे, विविध प्रयोगातील प्रयोगनिहाय नमुन्याचे कापुस वेचणी, कापुस साफ करणे व जिनिंग करणे, बियांची संख्या मोजणे व वजन करणे मजूर (स्त्री /पुरुष ) | प्रती दिवस | |
| १५ | कापुस वेचणे | प्रती किलो | |
| १६ | कापसाची जिंनिग करणे | प्रती क्विंटल | |
| १७ | कापूस स्वच्छ करणे | प्रती क्विंटल | |
| १८ | कापुस बोजे भरणे (२ क्विंटल) | प्रती नग | |
| १९ | पिकांची व कार्यालयाची इत्यादी संरक्षण करणे पहारेकरी (चौकीदारी) | प्रती दिवस | |
| २० | कार्यालयातील परिसर स्वच्छ ठेवणे | प्रती दिवस | |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | कार्यालयीन कामकाजाकरिता तांत्रिक मजुर | प्रती दिवस | प्रक्षेत्रावरील कापुस पिकासंबंधी कामे |
| २२ | ट्रक्टर चालक मजूर | प्रती दिवस | |
| २३ | ट्रक्टर ने नांगरणी(दोन / तीन फाळी ) | प्रती हेक्टर | |
| २४ | ट्रक्टर ने पट्टी पास / जाभूळवाही / डवरणी | प्रती हेक्टर | |
| २५ | बैलजोडीने वखर/पट्टी पास / जाभूळवाही / डवरणी (मजुरासह) | प्रती हेक्टर | |
| २६ | चाळणी ,वजन करणे लोडिंग व अनलोडिंग करणे | प्रती क्विंटल | |

वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ,
कापुस संशोधन विभाग,
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला

**नियम व अटी :-**

१. निविदा पत्रक कार्यालीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० या वेळेस स्वीकारल्या जातील.

२. निविदा वरिष्ठ संशोधन शात्रज्ञ,कापुस संशोधन विभाग,डॉ.पं.दे.कृ.वि, अकोला यांचे नावे सीलबंद लिफाफ्यात देण्यात यावे.

३. कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर लावण्याची संपूर्ण जवाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील

४. बिलावर GST क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे.

५. कंत्राटी मजुराचे वय १८ वर्षा पेक्षा कमी व ६० वर्षा पेक्षा जास्त असू नये.

६. आपण पुरवठा केलेल्या मजुराने अनुचित प्रकार केल्यास त्यच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.कंत्राटी मजुरांची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

७. प्रक्षेत्रावरील कामे करत असतांना कुठलीही दुर्घटना/अपघात/जिवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी, अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची सर्स्वी जबाबदारी सबंधित कंत्राटीदाराची राहील.

८. काही विपरीत घटना तथा विपरीत बाबी / प्रसंगी कंत्राट आपोआप संपूष्ठात येईल.

९. मजुरांची कामाची वेळ हि आठ तास कार्यालयाने ठरवून दिल्या प्रमाणे राहील.

१०. प्रक्षेत्रावरील प्रयोगाचे व्यवस्थापन, प्रात्याक्षिके व्यवस्थापन, व बिजोत्पादन कार्यक्रम इत्यादी कामे करत असतांना पिकाचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवुन दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई सबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येईल.

११. पुरवठाधारकाचे मजूर पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असतील त्यात विद्यापीठ प्रशासनाचा कोणताही संबंध कामावर ठेवण्याबाबत राहणार नाही. मजुरांची कुठल्याही प्रकारची कामावर असल्याची जेष्ठता यादी विभागामार्फत देण्यात येणार नाही.

१२. विभागावर देण्यात आलेली कामे पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत तक्रार आल्यास किवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

१३. कंत्राटदारास कामाच्या आवश्यकतेनुसार मजूर उपलब्ध करून द्यावे लागतील.

१४. मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकाने देयक सादर करतेवेळी बँक खाते क्रमांक बाबतची संपूर्ण माहिती देयक सादर करतेवेळी देण्यात यावी.

१५. कंत्राटदाराने कंत्राट मजुरास अदा केलेल्या रकमेची पगार स्लीप कार्यालयात सादर करावी.

१६. कंत्राटदारास कामे देतांना १०० रु. च्या बाँड पेपरवर उपरोक्त कामे व्यास्थित होण्यासाठी घालण्यात आलेल्या अटी/शर्ती मान्य असल्यास लिहून द्यावे लागेल.

वरिष्ठ संशोधन शात्रज्ञ,
कापुस संशोधन विभाग,
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला